## प्रेस नोट

## पंतप्रधान पीक बिमा योजना

राष्ट्रीय कृषी विमा योजना रब्बी हंगाम 1999-2000 पासुन राज्यात अधिसुचीत पिकां साठी राबविण्यात येत होती. ही योजना अधिक व्यापक करण्यासाठी खरीप हंगाम 2016 पासुन राष्ट्रीय कृषी विमा योजना रद्य करुन राज्यात पंतप्रधान पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे. अशा आशयाचा शासन निर्णय व त्यावरील मार्गदर्शक सुचना शासनाने दिनांक 05 जुलै 2016 रोजी निर्गमित केल्या आहेत.

सदर योजनची ठळक वैशिष्टये पंतप्रधान विमा योजना अधिसुचीत क्षेत्रातील अधिसुचीत पिकांसाठी बंधनकारक असुन बिगर कर्जदार शेतक-यांना ऐच्छीक आहे, या योजनेत वास्तवदर्शी दराने विमा हप्ता आकारण्यात येणार असुन त्याचा दर खरीप साठी 2% , रब्बी साठी 1.5 % व नगदी पीकासाठी 5% ठेवण्यात आला आहे. सर्व पिकांसाठी 70% जोखीम स्तर निश्चीत करण्यात आला आहे. या योजनेत पीक पेरणी पासुन काढणी पर्यतच्या कालावधीत नैसर्गीक आग , वीज , गारपीट , चक्रीवादळ , पुर , भुस्लखन , दुष्काळ , पाऊस खंड , कीड व रोग , पेरणी व लावणी न झाल्याने होणा-या पिकाचे नुकसान , स्थानिक नैसर्गीक आपत्तीमुळे होणारे नुकसान ईत्यादी बाबीचा विचार करुन जोखीमसह ठरविण्यात आला आहे.

**योजनेअंतर्गत पीके** – तृणधान्य व कडधान्य या संवर्गात – भात ( रु.39,000/- प्रति हेक्टर ) , खरीप ज्वारी ( रु.24,000/- प्रती हेक्टर ) , बाजरी ( रु.20,000/- प्रती हेक्टर ) , नाचणी( रु.20,000/- प्रती हेक्टर ) , मका ( रु.25,000/- ) , तुर ( रु.28,000/- प्रती हेक्टर ) , मुग ( रु.18,000/- प्रती हेक्टर ) , उडीद ( रु.18,000/- प्रती हेक्टर )

**गळीत धान्या मध्ये** – सोयाबीन ( रु.36,000/- प्रती हेक्टर ) , भुईमुग ( रु.30,000/- प्रती हेक्टर ) , तीळ ( रु.22,000/- प्रती हेक्टर ) , सुर्यफुल ( रु.22,000/- प्रती हेक्टर ) , कारळ ( रु.20,000/- प्रती हेक्टर )

**नगदी पिका मध्ये** – कापुस ( रु.36,000/- ) , खरीप कांदा ( रु.50,000/- प्रती हेक्टर ) यांचा समावेश करण्यात आला आहे.

सदरील विमा योजना ही क्षेत्र हा घटक धरुन राबविण्यात येणार असुन या योजनेत पीक उत्पादनाचा अंदाज काढण्यासाठी प्रत्येक पिका साठी घेण्यात येणा-या प्रलंबित विमा क्षेत्र घटक व त्यानुसार नियोजीत पिक पाहणी प्रयोगाची संख्या यांचा उपयोग केला जाणार आहे.

पंतप्रधान पीक विमा योजना राबविण्यासाठी शासनाने परभणी जिल्हयासाठी रिलायन्स जनरल ईन्शुरन्स कंपनी लि. मुंबई या विमा कंपनी सोबत करार केला आहे.

**योजनेचे वेळापत्रक व मुदत शासन निर्णया मध्ये विस्तृतपणे नमुद आहे व प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक 31 जुलै 2016 अशी निश्चित करण्यात आली आहे.** यासाठी संबधित जिल्हा मध्यवर्ती बँक शाखेत संपर्क साधावा व जास्तीत जास्त शेतक-यांनी या योजनेचा लाभ घ्यावा , असे आवाहन जिल्हा उपनिंबधक, सहकारी संस्था परभणी श्री. जी.जी.पुरी यांनी केले आहे.

जिल्हा उपनिंबधक
सहकारी संस्था परभणी